# राष्ट्रीय आरोग्य अभियान (N.H.M.)
# जिल्हा एकात्मिक आरोग्य कुटुंब कल्याण सोसायटी,
# जिल्हा परिषद, कोल्हापूर
## कंत्राटी पद भरती जाहिरात (सन २०१७-१८)

कोल्हापूर जिल्हयाकरीता ग्रामीण व मनपा स्तरावर लसीकरण क्षेत्र संनियत्रक यांची पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे एकत्रित मानधनावर कंत्राटी रिक्त पदांसाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. खालील नमूद केलेली पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून प्राप्त सुचनेनुसार पदांची नियूक्ती ३१ मार्च २०१८ पर्यंत राहतील.

| अ. क्र. | पदाचे नाव | एकुण भरावयाची पदे | वय | शासन मान्यता प्राप्त संस्थेची शैक्षणिक अर्हता | जातीचा प्रवर्ग | एकत्रित मंजूर मानधन | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | लसीकरण क्षेत्र संनियत्रक | ५ | खुला - ३८<br>राखीव - ४३ | कोणत्याही शाखेची पदव्युत्तर पदवी/पदविका | अजा - १<br>अज - १<br>खुला - ३ | ग्रामीण रु. १५,०००/- प्रति माह व ५,०००/- इंधन - वंगणासाठी | पदवी/पदविका/ पदव्युत्तर पदवी नंतर आरोग्य विभागाशी संबंधित शासकिय संस्थामध्ये/स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये कामाचा अनुभव |

## सूचना

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून नियुक्ती दि.३१ मार्च २०१८ पर्यंत राहील. जाहीरातीमधील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. पदांच्या संख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही. तसेच अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणासंबंधी दावा करणेचे अधिकार राहणार नाहीत.

२) पदांसाठी वेतन हे एकत्रित मानधन आहे.

३) जाहिरातीच्या दिवशी सदर पदांसाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे तसेच मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्षे व तांत्रिक पदासाठी शासन सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ६५ वर्षे राहील

४) शासकिय सेवेतुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी/कर्मचारी यांना जिल्हा शल्य चिकित्सक यांचे शारिरिक व मानसीक दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.

५) नियम व अटींच्या अधीन राहून नियुक्ती आदेश देणेत येतील. उमेदवारांची नियुक्ती ही गुणनिहाय करणेत येईल.

६) **विहीत नमुन्यात अर्ज साक्षांकित प्रतीसह जिल्हा राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, दुसरा मजला, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर येथे दि. ०६/११/२०१७ ते १५/११/२०१७ सायंकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.**

७) अर्जदाराने ए ४ आकाराच्या कोऱ्या कागदावर अर्ज करावयाचा असून त्यामध्ये खालील बाबी अंतर्भूत असाव्यात सोबत अर्जाचा नमूना प्रसिध्द केला आहे.

८) पदांची संख्या गरजेनुसार बदलू शकते.

९) स्थानिक उमेद्वारांना प्राधान्य राहील. (निर्धारित तालूके/मनपा)

१०) उमेद्वारांचे मराठी भाषेवर प्रभुत्व पाहिजे तसेच इग्रंजी भाषेचेही ज्ञान आवश्यक आहे.

११) उमेद्वारांकडे स्वतःचे दुचाकी वाहन व वैध दुचाकी वाहन परवाना आवश्यक आहे.

**अ) उमेदवाराची सर्वसाधारण माहिती :-** १) अर्ज केलेल्या पदाचे नाव २) ठळक अक्षरात स्वतःचे संपूर्ण नाव ३) अर्जदाराचा पत्ता, दूरध्वनी व मोबाईल क्रमांक ४) ईमेल आयडी ५) जन्मतारीख ६) शैक्षणिक अर्हतेचा संपूर्ण तपशिल - गुणपत्रक तसेच पदवी/पदविकेचे प्रमाणपत्र आवश्यक ७) कामाचा अनुभव - काम केलेली संस्था, एकूण कालावधी, संबंधित संस्थेत कोणत्या पदावर काम केलेले आहे.

**ब) आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती :-** १) शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र २) शाळा सोडल्याचा दाखला/जन्म तारखेचा दाखला ३) अनुभवाचे प्रमाणपत्र ४) पासपोर्ट आकाराचे एक फोटो ५) नावात बदल दस्तऐवज

**ड) स्वतःची माहिती :-** प्रत्येक अर्जदाराने अर्जामध्ये स्वतःचा मोबाईल नंबर, दुरध्वनी क्रं., ईमेल आयडी अचुक नमुद करणे आवश्यक आहे जेणेकरुन पदभरतीच्या अनुशंगाने सर्व सुचना सदर माध्यमाद्वारे देण्यात येतील. त्या संदर्भात कोणताही डाक/लेखी पत्र व्यवहार केला जाणार नाही.

१२)अर्जदार हा संबंधित पदांसाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा. तसेच अर्जदाराविरुध्द कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

१३) मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता व इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१४) सदर रिक्त पदांसाठी आवश्यक पात्रता असलेला अर्जदार न मिळाल्यास किंवा आवश्यक त्या संख्येत अर्जदार न मिळाल्यास त्या पदाकरीता असलेली पात्रता (अर्हता व अनुभव) आवश्यकतेनुसार शिथील करण्यात येईल. तसेच राखीव प्रवर्गाचे उमेदवार पुरेशा प्रमाणामध्ये उपलब्ध न झाल्यास रिक्त पदांच्या भरतीची आवश्यकता लक्षात घेता खुल्या प्रवर्गातील प्रतिक्षा यादीतील उमेदवाराला तात्पुरती नेमणूक देण्यात येईल.

१५)अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करणेत येईल. अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्याच्या सोईनुसार ठिकाण बदलून मागता येणार नाही.

१६) भरती प्रकिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत.याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१७) सर्व मागासवर्गीय अर्जदारांकरिता जातीचे प्रमाणपत्र आवश्यक आहे ते नसलेस अशा उमदेवारांना राखीव प्रवर्गामधून लाभ घेता येणार नाही.

१८) सदरची जाहिरात व अर्जाचा नमूना www.zpkolhapur.in या संकेत स्थळावरही उपलब्ध आहे.

| सदस्य निवड समिती | सदस्य सचिव निवड समिती | अध्यक्ष निवड समिती |
|---|---|---|
| तथा जिल्हा आरोग्य अधिकारी | तथा जिल्हा माताबाल संगोपन अधिकारी | तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, |
| जिल्हा परिषद, कोल्हापूर | जिल्हा परिषद, कोल्हापूर | जिल्हा परिषद, कोल्हापूर |

# अर्जाचा नमुना

............. या पदासाठी अर्ज

| पासपोर्ट आकाराचा उमेदवाचा नजीकचा साक्षांकित फोटो |
|---|

प्रति,
**मा.जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा एकात्मिक आरोग्य व कु.क.सोसायटी,**
**जिल्हा परिषद, कोल्हापूर**

संपूर्ण नाव मराठी इंग्रजी (कॅपीटल लेटर)
१) आडनाव ...................... ......................
२) स्वतःचे नाव ...................... ......................
३) वडिलांचे/पतीचे नाव ...................... ......................
४) पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता
पिनकोडसहीत . ..................................................................................
..................................................................................
५)ईमेल आयडी ..................................................................................
६) दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक ..........................................................................

७) जन्मतारीख :-

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

आजअखेर वय

| वर्ष | महिना | दिवस |
|---|---|---|
| | | |

८) खाली नमूद केलेल्या प्रवर्गासाठी लागू असलेल्या चौकटीमध्ये (✓) अशी खूण करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ. | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

९) शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

१०) संबंधित पदाविषयीचा अनुभव

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष |
|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | |
| | | | |

११) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.
१) ...................... २) .......................... ३) ......................... ४) ...................

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमूद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणिव आहे.

**दिनांक :** **अर्जदाराची सही**
**ठिकाण :** **नाव................**